भाषा संचालनालयातील कनिष्ठ ग्रंथपाल, गट-क
या पदांचे सेवाप्रवेश नियमात सुधारणा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग,
शासन निर्णय क्रमांक : भासंसे-२०१६/प्र.क्र.१०५/२०१६/आस्था-२,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २२ मार्च, २०१७.

<u>शासन निर्णय :</u>

भाषा संचालनालयातील कनिष्ठ ग्रंथपाल, गट-क या पदांच्या दि.२ मार्च, १९९८ रोजी संविधानाच्या अनुच्छेद-३०९ अंतर्गत प्रसिध्द केलेल्या सेवाप्रवेश नियमामध्ये करावयाची सुधारणा सोबतच्या अधिसूचनेत (इंग्रजी व मराठी) दर्शविल्याप्रमाणे शासन विहित करीत आहे.

२. उपरोक्त अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्रात स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक क्रमांक **२०१७०३२२१२१४४४९७३३** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Aparna Arvind Gawde
Digitally signed by Aparna Arvind Gawde
Date: 2017.03.22 17:19:50 +05'30'

(अपर्णा अ.गावडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव, मुंबई.
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुंबई.
मा.राज्यपाल यांचे परिवार प्रबंधक, मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर.
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई, (पत्राने).
सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग (सेवा), मंत्रालय, मुंबई.
सह सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई (पत्राने).
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
निवड नस्ती.

अधिसूचना

मराठी भाषा विभाग,
मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २२ मार्च, २०१७.

भारताचे संविधान

क्रमांक :- **भासंसे-२०१६/प्र.क्र.१०५/२०१६/आस्था-२ .-** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन आणि त्याबाबतीत करण्यात आलेल्या सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करुन, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या, मराठी भाषा विभागाच्या अधिपत्याखालील भाषा संचालनालयामधील कनिष्ठ ग्रंथपाल, गट-क पदाचे सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :-

(१) या नियमांस, मराठी भाषा विभागाच्या अधिपत्याखालील भाषा संचालनालयातील कनिष्ठ ग्रंथपाल, गट-क (सेवाप्रवेश) नियम, २०१७ असे म्हणावे.

(२) या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

(क) **"पदवी"** याचा अर्थ, सांविधिक विद्यापीठाची पदवी असा आहे;

(ख) **"विभाग"** याचा अर्थ, शासनाचा मराठी भाषा विभाग असा आहे;

(ग) **"पदविका"** याचा अर्थ, सांविधिक विद्यापीठाची पदविका असा आहे;

(घ) **"संचालनालय"** याचा अर्थ, शासनाच्या मराठी भाषा विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील भाषा संचालनालय असा आहे;

(च) **"उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा"** याचा अर्थ, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षा मंडळ अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा.४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाने नियंत्रित केलेली उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा आणि यामध्ये या परीक्षेस समकक्ष म्हणून घोषित केलेल्या इतर परीक्षा अंतर्भूत आहेत;

(छ) **"शासन"** याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे;

(ज) **"निवड समिती"** याचा अर्थ, या पदावर नियुक्तीसाठी संचालनालयामार्फत गठीत केलेली समिती.

(३) संचालनालयामधील **कनिष्ठ ग्रंथपाल, गट-क** पदावरील नियुक्ती, पुढील अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने करण्यात येईल-

(एक) ज्याचे, वय अडतीस वर्षापेक्षा अधिक नाही:

परंतु, आधीपासून शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिल करण्यात येईल. शासन सेवेतील मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना ५ वर्षे शिथिलतेची सवलत ते शासन कर्मचारी किंवा मागासवर्ग म्हणून त्यापैकी केवळ एकाच कारणाकरिता उपलब्ध राहील;

(दोन) ज्यांनी, उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे; आणि

(तीन) ज्यांनी, ग्रंथालय शास्त्र या विषयातील पदविका किंवा पदवी धारण केली आहे.

(४) सदर पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीस, शासन वेळोवेळी विहित करेल असे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील.

(५) सदर पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीस, त्याबाबतीत केलेल्या नियमानुसार मराठी व हिंदी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केलेली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळालेली नसेल तर, त्याला सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

(६) सदर पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडून वेळोवेळी विहित केलेले "संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र" धारण करणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Aparna Arvind Gawde

Digitally signed by Aparna Arvind Gawde
Date: 2017.03.22 17:17:49 +05'30'

(अपर्णा अ.गावडे)
शासनाचे उप सचिव

NOTIFICATION

Marathi Language Department,
Madam Cama Road,
Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032.
Dated the 22 March, 2017.

Constitution of India.

No.DLR-2016/C.R.105/2016/Astha-2.- In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all existing rules, orders or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the post of Junior Librarian, Group C in the Directorate of Languages under the Marathi Language Department of the Government of Maharashtra, namely:-

1. These rules may be called the Junior Librarian, Group C, in the Directorate of Languages under the Marathi Language Department (Recruitment) Rules, 2017.

2. In these rules, unless the context otherwise requires,-

(a) "Degree" means a degree of a statutory University;

(b) "Department" means the Marathi Language Department of Government;

(c) "Diploma" means a diploma of a statutory University;

(d) "Directorate" means the Directorate of Languages under the administrative control of Marathi Language Department of the Government;

(e) "Higher Secondary School Certificate Examination" means the Higher Secondary School Certificate Examination conducted by a Divisional Board established under the Maharashtra Secondary and Higher Secondary Education Boards Act, 1965 (Mah. XLI of 1965) and includes any other examination declared by the Government to be equivalent thereto;

(f) "Government" means the Government of Maharashtra;

(g) "Selection Committee" means the Committee constituted by

the Directorate for recruitment to the post.

3. Appointment to the post of Junior Librarian, Group C, in the Directorate shall be made by nomination from amongst the candidates who, -

(i) are not more than thirty-eight years of age:

Provided that, the upper age limit may be relaxed upto five years in case of candidates already in the Government Service. In case of persons of backward category who are already in Government service can get relaxation of five years either as Government servant or backward category candidate;

(ii) have passed Higher Secondary School Certificate Examination; and

(iii) possess a diploma or degree in Library science.

4. A person appointed to the post shall be required to complete the training successfully prescribed by the Government, from time to time.

5. A person appointed to the post shall be required to pass examination in Marathi and Hindi languages according to the rules made in that behalf, unless he has already passed or has been exempted from passing those examinations.

6. A person appointed to the post should possess a Certificate in Computer Operation prescribed by the Directorate of Information Technology, Government of Maharashtra, from time to time.

By order and in the name of the
Governor of Maharashtra,

Aparna
Arvind
Gawde

Digitally signed by
Aparna Arvind Gawde
Date: 2017.03.22
17:16:11 +05'30'

(Aparna A. Gawde)
Deputy Secretary to Government.